# कार रॅलीला आजपासून गोव्यातून प्रारंभ

▶ मडगाव / प्रतिनिधी

२००० किलोमीटर लांबीच्या 'कर्मा एन्ड्युरा चॅरिटी चॅलेंज कार रॅली'ला आज बुधवार ३ पासून गोव्यातून सुरुवात होणार असून गोवा, कर्नाटक, तामिळनाडूमार्गे केरळात रॅली संपणार असल्याची माहिती काल सेर्नाभाटी येथील 'बेवॉच' रीसोर्टमध्ये घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सदर रॅली दुसऱ्यांदा आयोजण्यात येत असून या पूर्वी २००८ साली वरीलप्रमाणे रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत अम्बेसिडर कार वापरण्यात येणार असल्याची माहिती हिंदुस्तान मोटर्सचे संपर्क सरव्यवस्थापक राजीव सक्सेना यांनी दिली. मागील वेळी झालेल्या रॅलीत चांगला प्रतिसाद लाभला होता. यंदाही २४ कार या रॅलीत भाग घेणार आहेत.




**सेर्नाभाटी :** 'कर्मा एन्ड्युरा चॅरिटी चॅलेंज कार रॅली'मध्ये भाग घेण्यासाठी सज्ज झालेल्या अम्बेसिडर कार.

या रॅलीत जास्त करून विदेशी पर्यटकांनी भाग घेतला असून त्यांनी चॅरिटीसाठी खास मदत करण्यासाठी २ कोटी रुपये गोळा केल्याचे सांगण्यात आले. काल गोव्यात ५० किलोमीटर रॅली काढण्यात आली. आज सकाळी ८ वाजता प्रत्यक्ष रॅलीस सुरुवात होणार आहे.

### २०१२ पर्यंत अम्बेसिडर नवीन मॉडेलात

अम्बेसिडर कार आता आपले रूप बदलणार असून युवा आणि मध्यमवर्गीयांच्या पसंतीनुसार विविध नवीन मॉडेल्समध्ये बाजारपेठेत उतरणार असल्याची माहिती श्री. सक्सेना यांनी दिली.

अन्य नवीन गाड्यांना असलेल्या सुविधा तसेच नवीन तंत्रज्ञानाचा त्यात समावेश करण्यात येणार असून उत्कृष्ट दर्जाच्या सुविधा पुरविण्यासाठी युरोपियन कंपन्यांशी चर्चा चालू असल्याचे सांगण्यात आले.

सध्याच्या अम्बेसिडर कार यापुढे उपलब्ध होणार असून या कारना आस्थापने, सैनिक दल, सरकारी कार्यालयांत जास्त मागणी असली तरी आता कंपनीने किरकोळ मार्केटकडे जास्त लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले असल्याचे सक्सेना यांनी सांगितले.

आम आदमीची मागणी लक्षात ठेवून सध्याच्या कारच्या तुलनेत नवीन मॉडेलमधील एखाद्या कारची किंमत कमी राहणार असून ती आम आदमीला परवडणारी असल्याचे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.